Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

# हैं तय्यार हम...




**सानिया डिस्ट्रिब्युटर्स ग्रुप :** (डावीकडून) शेख शाहरुख, शेख फेरोज, सय्यद आलिम, राहुल अग्रवाल, पंकज अग्रवाल, वीरेंद्र अग्रवाल, कैलाश पाटील, निलेश पाटील, मंगेश देशपांडे, उमेश तांबे.




**क्रेयॉन्स दी प्ले स्कूल, उस्मानपुरा** डावीकडून सुप्रिया शिसोदिया, अपूर्वा मुगळीकर, सोनल लदनिया, नेहा महेश्वरी, हनेश शाह.




**फिटनेस मिलेनियम ग्रुप :** (डावीकडून) दत्ता फुके पाटील, सुदीप बोर्डे, हर्षल पाटील, आनंद सोनोने, पृथ्वीराज चव्हाण, कपिल शिंदे, अॅड. नानासाहेब झिंजुर्डे, अभिषेक झिंजुर्डे, रत्नदीप ढानकर, अक्षय शिंदे, पार्थ मसलेकर, वैभव धनवई, प्रफुल्ल आवारे, सुनील काळे.

# निर्मात्यांवर झरीनचे गंभीर आरोप !

अभिनेत्री झरीन खानचा 'अक्सर २' रिलीज झाला असून अलीकडे या चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान झरीनसोबत लोकांनी छेडछाड करण्याचा प्रयत्न केला. दिल्लीतील या प्रमोशनल इव्हेंटमध्ये अचानक ४० ते ५० लोकांच्या घोळक्याने झरीनला घेरले आणि तिच्यासोबत फोटो काढून घेण्यासाठी त्यांनी धक्काबुक्की सुरू केली. याच गर्दीतील काहींनी झरीनसोबत छेडछाड करण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे व्यथित झरीन यानंतर लागलीच रात्रीचे फ्लाइट पकडून मुंबईला परतली. या सगळ्या प्रकारावर झरीन बोलली आहे. विशेष म्हणजे, दिल्लीतील या छेडछाडीच्या घटनेनंतर चित्रपटाच्या निर्मात्यांबद्दलचा तिचा संताप उफाळून आला आहे. वरुण बजाज या चित्रपटाचे निर्माते आहेत. झरीनने वरुण बजाज यांना 'अनप्रोफेशनल' ठरवून त्यांच्यावर अनेक आरोप केले आहेत. एवढेच नव्हे, तर चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान सुरुवातीपासून सगळे काही ठीक नव्हते. तिने म्हटले, की चित्रपट साईन करताना हा एक क्लीन चित्रपट असल्याचे मला सांगण्यात आले होते; पण प्रत्यक्ष शूटिंग सुरू झाल्यावर सगळेच उलट घडले. प्रत्येक फ्रेममध्ये मला तोकडे कपडे घालण्यास सांगितले गेले. खरे तर अशा कपड्यांची काहीही गरज नव्हती. मला न सांगता आणि काहीही कारण नसताना चित्रपटातील किसिंग सीन्स वाढविण्यात आले, हे आणखीच वाईट होते.



# करिश्मानेही केला होता 'घुमर' डान्स !

'पद्मावती' चित्रपटाला विरोध करणाऱ्या विरोधकांच्या अनेक आक्षेपांपैकी एक आक्षेप आहे, या चित्रपटातील 'घुमर' या गाण्याला. रजपूत राजघराण्यातील महाराण्या असे सगळ्यांपुढे नृत्य करत नसत. त्यामुळे 'पद्मावती'त राणी पद्मावतीची भूमिका साकारणाऱ्या दीपिकाला असे सर्वांसमोर नाचवणे गैर आहे, असे 'पद्मावती'ला विरोध करणाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे 'घुमर' सध्या चर्चेत आहे. दीपिकाचा हा डान्स आठवण्यामागे आणखीही एक वेगळे कारण आहे. हे कारण म्हणजे चित्रपटात 'घुमर' डान्स करणारी दीपिका पहिली अभिनेत्री नाहीये. तिच्याआधीही एका अभिनेत्रीने 'घुमर' डान्स केला आहे. ही अभिनेत्री कोण? तर करिश्मा कपूर. होय, करिश्माचा 'जुबैदा' हा चित्रपट तुम्ही पाहिला असेल, तर त्यातील 'घुमर' डान्सही तुम्ही पाहिला असेल. यात करिश्मा कपूर लीड रोलमध्ये होती. तिने जुबैदाची भूमिका साकारली होती. चित्रपटात जुबैदा बनलेल्या करिश्माला राजा विजयेंद्र सिंहसोबत प्रेम होते आणि ती रजपूत घराण्याची दुसरी सून बनते. राजाच्या पहिल्या पत्नीची भूमिका अभिनेत्री रेखाने साकारली आहे. नव्या राणीच्या स्वागतासाठी हे नृत्य सादर केले जाते, असे एक दृश्य या चित्रपटात आहे. हे नृत्य पाहून जुबैदा इतकी आनंदी होते, की ती स्वतः उठून नृत्यात सहभागी होते; पण रेखा तिला रोखते. 'तू राणी आहेस आणि नृत्य करणाऱ्या महिलांसोबत नाचू शकत नाहीस,' असे रेखा तिला समजावताना यात दिसतेय.



cnx.
AURANGABAD | 25:11:2017 | www.cnxmasti.com
ENTERTAINMENT | TV | ON SCREEN | PROMOTIONAL FEATURES | LIFESTYLE
लोकमत

एका मालिकेतील पूजा म्हणजेच शीन दास आणि नरेन म्हणजेच अक्षय म्हात्रे हे प्रेक्षकांना खूप आवडत आहेत. खालिद सिद्दीकी यांच्यात एक खूप इंटरेस्टिंग दृश्य चित्रित करण्यात आले. राहुल म्हणजेच अंकित व्यास आणि कपूर यांचे सत्य आता उघड होणार आहे आणि नरेनला कळणार आहे, की पूजाचे म्हणणे योग्य होते आणि त्यानंतर तो तिच्याशी लग्न करण्यासाठी तयार होणार आहे.



## Glam Window



### मी रणवीरला डेट करणार-दीपिका

दीपिका पादुकोणचा 'पद्मावती' सिनेमा सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला असला, तरी दीपिका सध्या या सिनेमाचं जोरदार प्रमोशन करत आहे. सिनेमाच्या प्रमोशनसाठी दीपिका एका रिअॅलिटी शोच्या सेटवर आली होती. यावेळी तिने रणवीरला डेट करणार असल्याचं सांगितलं.



### सलमानने गायले गाणे !

अभिनेता सलमान खानच्या कुटुंबात डबल सेलिब्रेशन होतं. कारण सलमानचे आई-बाबा सलमा खान आणि सलीम खान तसंच बहिण अर्पिता खान आणि आयुष शर्मा यांच्या लग्नाचा वाढदिवस होता. या दिवशी सलमानने आपल्या आई-वडिलांना खास गिफ्ट दिलं. त्याने त्याच्या आईवडिलांसाठी 'जब कोई बात बिगड जाए' हे गाणं गायलं. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



Sachin Tendulkar
@sachin_rt

Remembering Sri Sathya Sai Baba and his teachings on his 92nd birthday. Love all serve all, help ever hurt never... such an apt summary of how to live life.

# एकत्र डेब्यू करणारे स्टार्स; काही हिट-काही फ्लॉप !

जान्हवी आणि ईशान लवकरच दिग्दर्शक करण जोहरच्या आगामी 'धडक' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहेत. 'धडक' हा मराठीतील ब्लॉकबस्टर चित्रपट ठरलेल्या सैराटचा हिंदी रिमेक आहे. तसं पाहिलं तर दोघेही स्टारकिड. जान्हवी ही श्रीदेवी आणि बोनी कपूरची मुलगी, तर ईशान खट्टर हा नीलिमा आजमी यांचा मुलगा. या दोघांनी आता 'धडक' मधून एकत्र प्रवास केला आहे. त्यांच्या कारकीर्दीत ते हिट होतात की फ्लॉप? हे त्यांचे चित्रपटच सांगू शकतील. बॉलिवूडमध्ये असे अनेक स्टार किड्स आहेत, ज्यांनी एका चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. पण, यापैकी काही हिट ठरले तर काहींवर मात्र सुपरफ्लॉपचा शिक्का बसला. पाहूयात मग कोणकोण आहेत असे स्टार्स...

cnx. Exclusive
टीम सीएनएक्स

## रणबीर-सोनम



ऋषी कपूर आणि नीतू सिंग यांचा मुलगा रणबीर कपूर आणि अनिल कपूर यांची मुलगी सोनम कपूर यांनी 'साँवरिया' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पाऊल ठेवले होते. खरं तर दोघांचा पदार्पणातील चित्रपट फ्लॉप ठरला. पण, हे दोन्ही स्टार किड्स बॉलिवूडमध्ये स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करण्यात यशस्वी ठरले. रणबीरने 'बचना ए हसीनों', 'वेकअप सिड', 'अजब प्रेम की गजब कहानी', 'राजनीती' अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम केले. तर दुसरीकडे सोनमने सुद्धा 'आयेशा', 'मौसम', 'प्लेयर्स' अशा अनेक चित्रपटांमध्ये स्वतःची वेगळी छाप उमटवली.

## बॉबी-टिंवकल



धर्मेंद्र यांचा मुलगा बॉबी देओल आणि राजेश खन्ना यांची मुलगी ट्विंकल खन्ना यांनी 'बरसात' या चित्रपटातून डेब्यू केले होते. चित्रपट हिट ठरला, मात्र या दोन्ही स्टार किड्सचे फिल्मी करिअर फ्लॉप ठरले. बॉबीने 'गुप्त', 'करीब', 'बादल', 'आशिक', 'हमराज' सह अन्य काही चित्रपट केले. तर ट्विंकल 'जान', 'इतिहास', 'बादशाह', 'मेला'सह आणखी काही चित्रपटांमध्ये झळकली.

## वरुण-आलिया



दिग्दर्शक डेव्हिड धवन यांचा मुलगा वरुण धवन आणि महेश भट यांची कन्या आलिया भट यांनी करण जोहरच्या 'स्टूडंट ऑफ द ईयर' या चित्रपटातून डेब्यू केले होते. या दोन्ही स्टार किड्सनी अल्पावधीतच इंडस्ट्रीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. वरुणने 'मैं तेरा हीरो', 'हम्टी शर्मा की दुल्हनियां', 'बदलापुर', 'बद्रीनाथ की दुल्हनियाँ' या चित्रपटांमध्ये काम केले. तर आलिया '२ स्टेट्स', 'हायवे', 'हम्टी शर्मा की दुल्हनियाँ'सह आणखी काही गाजलेल्या चित्रपटांमध्ये झळकली.

## अभिषेक-करिना

अमिताभ बच्चन यांचा मुलगा अभिषेक बच्चन आणि रणधीर कपूर यांची मुलगी करिना कपूरने 'रिफ्यूजी' या चित्रपटातून डेब्यू केले होते. अभिषेकने अनेक हिट चित्रपटांमध्ये काम केले. पण त्याला वडिलांसारखे यशोशिखर गाठता आलेले नाही. 'तेरा जादू चल गया', 'हां मैंने भी प्यार किया', 'कुछ ना कहो', 'रन' सह अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये अभिषेक झळकला आहे. तर करिना कपूर इंडस्ट्रीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. तिने 'मुझे कुछ कहना है', 'चमेली', 'ऐतराज', 'ओमकारा', 'जब वी मेट' सह अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम केले आहे.



## अथिया-सूरज



सुनील शेट्टी यांची मुलगी अथिया शेट्टी आणि आदित्य पंचोलीचा मुलगा सूरज पंचोलीने 'हीरो' या चित्रपटातून डेब्यू केले होते. या चित्रपटानंतर अद्याप सूरजचा कुठलाही चित्रपट रिलीज झालेला नाही. तर अथिया याचवर्षी 'मुबारकाँ' या चित्रपटांत झळकली. पण, चित्रपटात ती स्वतःची वेगळी छाप उमटवू शकली नाही.

# ऋषी कपूर पुन्हा वादात !



अभिनेता ऋषी कपूर आणि वाद हे जणू काही समीकरणच बनलं आहे. वादग्रस्त ट्विटमुळे गेल्या काही महिन्यांत ऋषी कपूर या ना त्या वादात अडकले आहेत. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानबाबतच्या एका ट्विटमुळे ऋषी कपूर यांच्यावर प्रचंड टीका झाली होती. मात्र या वादानंतर ऋषी कपूर यांनी सोशल मीडियापासून काहीसं दूर राहणंच शहाणपणाचं समजलं. सध्या त्यांच्या ट्विटर अकाऊंटवर कोणतंही ट्विट पाहायला मिळत नाही. मात्र ऋषी कपूर आणि वाद हे नातं असं काही बनलं आहे की, एक नवं प्रकरण समोर आलं आहे. यावेळी ऋषी कपूर यांनी ट्विटरवर कोणतीही पोस्ट केलेली नसून वैयक्तिक मेसेजमुळे ते अडचणीत सापडलेत. एका महिलेला केलेल्या अभद्र मेसेजमुळे ऋषी कपूर नव्या वादात अडकले आहेत. ही महिला म्हणजे आरजे सुचित्रा त्यागी. ऋषी कपूर यांनी सुचित्रा त्यागीला एकामागून एक मेसेज करुन अपमानित केले. याच चॅटचा स्क्रीनशॉट आरजे सुचित्रा हिने ट्विटरवर शेअर केला आहे.

# भारती-हर्षचे वेडिंग साँग व्हायरल !



कॉमेडियन भारती सिंग लवकरच विवाहबंधनात अडकणार आहे. येत्या ३ डिसेंबरला बॉयफ्रेंड हर्ष लिंबाचियासोबत ती लग्नगाठ बांधणार आहे. गोव्यात रंगणाऱ्या भारती व हर्षच्या या लग्नसोहळ्याचे इनसाईड फोटो पाहायला साहजिकच चाहते उत्सुक आहेत. भारती व हर्षच्या या प्री-वेडिंग फोटोसारखेच एक इंटरेस्टिंग गोष्ट आम्ही तुमच्यासाठी घेऊन आलो आहोत. काय तर भारती व हर्षचे स्वतःचे वेडिंग साँग. होय, या वेडिंग साँगमध्ये भारती व हर्षचा रोमॅन्टिक अंदाज बघण्यासारखा आहे. 'भारती का रोमान्स', 'भारती की बारात' या नावाने भारती व हर्षच्या वेडिंग साँगचा व्हिडिओ वेगात व्हायरल होतो आहे. भारतीसाठी गिटार वाजवणारा हर्ष, तिला खळखळून हसवणारा, तिच्यासोबत काही रोमँटिक क्षण घालवणारा हर्ष हे सगळे पाहणे, भारतीच्या चाहत्यांसाठी निश्चितपणे एक वेगळा अनुभव असेल. हे दोघे दीर्घकाळापासून रिलेशनशिपमध्ये आहेत. लग्नानंतर हे कपल युरोपमध्ये हनीमूनला जाणार आहेत.